**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/५८४५५० /२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक-१६/१२/२०२३

विषय :- दि.१/१/२०२४ रोजी जयस्तंभ पेरणेफाटा ता. हवेली जि. पुणे येथील कार्यक्रमाचे अनुषंगाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत अधिसुचना.

१. चाकण ते शिक्रापुर व शिक्रापुर ते चाकण अशी दोन्ही बाजुकडील जाणा-या व येणा-या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. (अनुयायी यांच्या वाहनांखेरीज)
२. सोलापुर रोडवरुन आळंदी चाकण या भागात येणारी जड वाहने माल वाहतुक (टेम्पो /ट्रक) ही वाहने हडपसर-मगरपट्टा-खराडी बायपास मार्गे विश्रांतवाडी येथुन आळंदीकडे तसेच देहुफाटा चौकात डावीकडे वळुन पुढे पुणे नाशिक रोडवरुन चाकण येथे जातील.
३. मुंबई येथुन अहमदनगरकडे जाणारी जड वाहने/माल वाहतूक (टेम्पो/ट्रक) ही वाहने वडगाव मावळ-एचपी चौक म्हाळुंगे - वासोली फाटा- बिरदवडी गाव- रोहकल फाटा-पुणे नाशिक रोड-खेड- मंचर- नारायणगाव,-आळेफाटा मार्गे अहमदनगर येथे जातील.
४. मुंबई येथुन अहमदनगरकडे जाणारी जड वाहने/माल वाहतूक (टेम्पो/ट्रक) ही वाहने वडगाव मावळ- एचपी चौक म्हाळुंगे- वाघजाईनगर- बिरदवडी गाव- रोहकल फाटा- पुणे नाशिक रोड-खेड- मंचर- नारायणगाव-आळेफाटा मार्गे अहमदनगर येथे जातील.
५. मुंबई येथुन अहमदनगर बाजुकडे जाणारी हलकी वाहने उदा. कार,जिप इ. वडगाव मावळ-चाकण चौक - खेड- पाबळ- शिरुर मार्गे अहमदनगर येथे जातील.
६. आळंदी- शेल पिंपळगाव- बहुल- साबळेवाडी दोन्ही बाजुकडील जाणारी व येणारी सार्वजनिक/खाजगी प्रवासी वाहतूक पुर्ण पणे बंदी करण्यात येत आहे.(अनुयायी यांच्या वाहनांखेरीज)
७. आळंदी -मरकळ- लोणीकंद कडे जाणारी व येणारी सार्वजनिक/खाजगी प्रवासी वाहतूक पुर्ण पणे बंदी करण्यात येत आहे. (मरकळ गाव, इंद्रायणी नदी पुलावर ९ फुट उंचीवर लोखंडी ओव्हरहेड बॅरिकेट लावले असल्याने त्यापेक्षा जास्त उंचीची वाहने तेथुन जावु शकणार नाहीत. त्यापेक्षा कमी उंचीच्या फक्त अनुयायी यांच्या वाहनांना प्रवेश दिला जाईल.)
८. मुंबई कडुन देहुरोड येथे जुन्या पुणे मुंबई हायवेने येणारी वाहतूक सेंट्रल चौकातुन निगडी -पिंपरी चिंचवडकडे न जाता सदरची वाहतूक ही सेंट्रल चौकाकडुन मुंबई बेंगलोर हायवेने सरळ वाकडनाका- चांदणी चौकातुन इच्छित स्थळी जावु शकतील. (अनुयायी यांच्या वाहनांना प्रवेश दिला जाईल.)
९. मुंबई कडुन एक्सप्रेस हायवेने पुणे कडे जाणारी वाहने उर्से टोलनाका येथुन मुंबई बेंगलोर हायवेने (निगडी मुकाई चौकाकडे न जाता) सरळ वाकड नाका व राधा चौक येथुन पुणेकडे जावु शकतील.(अनुयायी यांच्या वाहनांना प्रवेश दिला जाईल.)

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड, यापुर्वी जे काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) अनुयायी यांची वाहने खेरीज करून तात्पुरत्या स्वरुपात

Scanned with OKEN Scanner

आदेश काढण्यात येत आहे.

वरील प्रमाणे चाकण, म्हाळुंगे, दिघी-आळंदी, देहुरोड, तळेगाव, भोसरी वाहतुक विभाग अंतर्गत येणा-या व जाणा-या परिवहन महामंडळाच्या बसेस, जड, हलकी वाहने/माल वाहतुक टेम्पो/ट्रक वाहनांकरीता वरील मार्गावर दि.३१/१२/२०२३ रोजी १७.०० वा पासुन ते दि.०१/०१/२०२४ रोजी रात्रौ २४.०० वा. पर्यत वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन) काढण्यात येत आहे.

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
३) पोलीस उप आयुक्त, परि १, २, ३
४) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

५) प्रभारी अधिकारी **संबंधीत** वाहतुक विभाग

gle Maps




Map data ©2023 5 km

पर्यायी मार्ग (जड-अवजड वाहनांव

पर्यायी मार्ग (हलक्या वाहनांकरी

प्रवेश बंद

Scanned with OKEN Scanner